# कला व वाणिज्य महाविद्यालय
# वडुज ता. खटाव जि. सातारा



नाव :- बागल सुशांत नानासो

वर्ग :- बी .ए .भाग .३

परिक्षाक्रमांक.५०३

विषय :-मराठी काव्यशास्त्र

पेपर क्रमांक

सन २०१५.१६

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

लावणी हा महाराष्ट्रातील कलाप्रकार आहे. लावणी हा महाराष्ट्राचा अतिशय लोकप्रिय लोककलाप्रकार आहे. लवण म्हणजे सुंदर. लवण या शब्दावरुन लावण्यगीत वा लावणी शब्द तयार झाला आहे. लावणी म्हणजे गीत, नृत्य, आणि अदाकारी यांचा त्रिवेणी संगम लावणी शृंगारची खाण महाराष्ट्राची शान आहे.

'लावणी' च्या उत्पत्ती विषय दोन स्वतंत्र विचारप्रवाह आहेत. लावणीचे मूळ संतांच्या विरण्या, गौळणी, बाळक्रीडेचे अभंग यात दिसते. संतांचे संस्कार घेऊन तंतांनी म्हणजे शाहिरांनी ज्या विविध रसांच्या रचना केल्या त्यात लावणीही होती. आपल्याकडील संतांचे संस्कार हे तंतांवर होते.

लावणीच्या मूळ हालाच्या 'सप्तशती'त आढळते, आणि हा ग्रंथ वाशीम येथे लिहला गेला. म्हणजेच विदर्भांतच लावणीचा जन्म झाला असावा. लावणी ही लोकजीवनाशी सबंधित रचना आहे. लोकांमध्ये रुढ असलेल्या संकल्पना संकेत, लोकाचार या लौकिक बाबीवर लावण्या आढळतात. लावणीचे बिजे रंगपंचमीच्या उत्सवात असण्याची शक्यताही वर्तवली जाते.

देऊळगावराजा जिल्हा बुलढाणा येथील अठराव्या शतकातील नारुबापूने लिहलेली लावणी अनंत फंदींनी प्रकाशित केली आहे. महार समाजातील लावण्याचे स्वरुप आगळे वेगळे आहे. खल्लार जि अमरावती येथील श्री गुलाबराव खंडारे ह्यांनी लावणींची परंपरा कित्येक वर्ष चालविली होती. ह्या लावण्यांचे स्वरुप प्रेमकथा वा करुण शृंगारकथा असे असायचे बायजाबाई नावाच्या सुंदर स्त्रीवरील त्यांची लावणी प्रसिद्ध होती.

Scanned with CamScanner

# लावणीचे स्वरुप

महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा असलेली लावणी महाराष्ट्रात अतिशय लोकप्रिय आहे. वाघ गीतांच्या तालावर लावणी गाऊन, नाचून सादर केली जाते मुळात लोकगीताशी असून लोकगीतातील ठेका, आशयय व अनुभव लावणीत दिसून येतो. सर्वसामान्यांच्या भावना चित्रित करण्याकरीता या लोककला प्रकाराचा प्रभावी वापर करण्यात आला. सुंरवातीच्या काळात नाच्यापोऱ्या लावणी सादर होतना ती अधिक बहारदार बनली. आपल्या पायांतील चाळांच्या नादातून रंगतदार बनलेल्या लावणीला 'रंगबाजी' असेही म्हणतात.

लावणीमध्ये वादये व नृत्य यांचा समावेश असल्याने लावण्या खूपच रंगतदार होतात. लावणी हा एक सांस्कृतिक वारसा आहे शृंगार विरहाचा पारिपोष करणारी गाणी या गायन प्रकारात प्रामुख्याने गायिल्या जातात. छक्कड, भेदिक, महारी ढोलकीच्या लावण्या असे लावणीचे प्रकारही आहेत. शाहिरांनी शृगारिक लावण्या जरी अधिक प्रमाणात लिहल्या, तरी उपदेशपर, पारमार्थिक आणि अध्यात्मिक रचनासुद्धा त्यांनी केल्या.

लावणी या छंदाचे स्वरुप अस्सल मराठी वाटत असले, तरी त्यांचे मूळ हिंदुस्तानात आहे असे दिसते. अशा या प्रभाकर मांडे यांचे मत आहे स्थूलमानाने लावणी अनागार समाजासमोर सादर केली जात असल्यामुळे, त्याचे स्वरुपाची रचना शाहिरांनी केली आहे. स्त्रीयांच्या सहभागातील लावण्या हया बैठकितच सादर होत असत. पेशवाईच्या अस्तानंतर शाहिरांचा राजाश्रय गेल्यामुळे ते सैरभर झाले. उदरनिर्वाहासाठी व लोकरंजनाचा उद्‌देश समोर ठेवून उघाडयावर तमाशाचे फड उभे झाले, आणि शृंगारीक लावणी ही तमाशाचे मुख्य केंद्र बनली वर्षानुवर्ष लावणीचा प्रभाव लोकांच्या मनावर कायम आहे. स्त्री पुरुष संबधातील विविद्धि छटा मराठी लावणीने जश्या रंगविलेल्या आहेत त्या प्रमाणे दुसऱ्या कोणत्या भाषेने रंगविल्या असतील असे वाटत नाही. लावणी म्हणजे शृंगार, प्रणव असा समज आहे. पण लावणी म्हणजे शृंगारीक भावभावनांचा लावणीत प्रभाव असला तरी लावणीमध्ये पौराणिक, अध्यात्मिक, सामाजिक, काल्पनिक, असे लौकिक विषय हाताळले जातात.

Scanned with CamScanner

# लावणीची परंपरा

लावणीची परंपरा ही प्राचीन असून पोवाडयाप्रमाणे लावणीचा उल्लेख प्राचीन ग्रंथात आला आहे. मराठीतील आदय ग्रंथात कवी मुकुंदराज यांच्या एका अभंगव्दारे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. तो पुढीलप्रमाणे :

- **मुकुंदराज :**
  ''सत्व तम रज गेले निरसोनी द्रशाची लावणी कैसी जाली। गेली गा माझारी पाहतांना दिसे। स्वंये ते प्रकाशं सदोसदित आता बाहेरी ही पाहतांची जरी। शुन्याची ओवरी गायियेली''
  मुकुंदराजांच्या अभंगात 'लावणी हा शब्द लावणे, रचना करणे, सृष्टीची निर्मिती या अर्थाने आलेला आहे.

- **डॉ.क्र.पा.कुलकर्णी :**
  ''लापणिका'' या संस्कृत शब्दापासून 'लावणी' हा शब्द तयार झाला असावा. 'लावणिका' हा शब्द महानुभव साहीत्यात केशवराजसुरी यांनी वापरला आहे. त्यांच्या ग्रंथाचे नाव 'लापणिका' असे आहे.

- 'लावणी' हा शब्द संस्कृत ''लू'' या धातूवरून आला ''लू'' म्हणजे कापणी पीक कापणीच्या वेळी म्हणायचे गीत ती ''लावणी''.

- 'लवन' म्हणजे 'सुंदर' यावरुन लावण्य–लावणी शब्द तयार झाला.

- 'लावणी' नृत्यात नर्तकी शरीर सहजपणे लववते म्हणून 'लावणी' त्यावरुन लावणी.

Scanned with CamScanner

- ‘लापनिका’ या संस्कृत शब्दापासून ‘लावणी’ हा शब्द तयार झाला असावा लापनिक हा शब्द महानुभव साहित्यात केशवराव सुरी यांनी वापरला आहे. त्यांच्या ग्रंथाचे नाव ‘लापनिका’ असे आहे.

- ‘लावणी’ हा शब्द ज्ञानेश्वरांनी सोळाव्या अध्यायात वापरला आहे :
  तेया निरोपनाचेनि नावे। अध्यायपद सोळावे ।
  लावणी पाहता जाणवे। मागितला वरी ।।

- ज्ञानेश्वरांनी लावणी हा शब्द मांडणी रचना या अर्थाने उपायोजिला आहे. लावण्य हा शब्दही ज्ञानेश्वरीत आला आहे. :
  देशियेचे लावण्य। हिरोनि आणिले तारुण्य
  मग रचिले अगन्य । गीतात्व ।।



# लावणीचे प्रकार

लावणी ही वाचण्याचा वाङ्:मय प्रकारात नसून ती ऐकण्याचा व प्रामुख्याने पाहन्याचा प्रकार आहे. तसेच लावणीचे मुख्यता तीन प्रकार आहेत. नृत्यप्रधान , गानप्रधान आणि अदाकारीप्रधान लावणी . प्रारंभकाळात लावणी गेय स्वरूपात ज्ञात होती नृत्यप्रधान लावणी हे अगदी अलीकडच्या काळातील रूप होय. जुन्नरू ,हौधाची ,बालेघाटी , छकुड ,पंढरपुरीबाजाची अशी लावणीची विविध रूपे आहे. तसेच लावणीचे सात प्रकार आहे

१. **फडाची लावणी** :- नाच्या,सोंगाडया व नृत्य अभिनयाच्या जोडीने गायलेली लावणी.

२. **बैठकीची लावणी** :- तबला ,पेटी ,तंबुरी या बरोबर बैठकीत गायलेली लावणी.

३. **बालघाटी** :- विरह - दु:खाची भावना आळवणारी लावणी.

४. **छक्कड** :- उत्तान -शृंगारिक आशय असणारी लावणी.

५. **सवाल जबाबयुक्त लावणी** :- कलगीतुरेवाली प्रश्नोत्तरे असलेली लावणी.

६. **चौकाची लावणी** :- चार चौकाची. चार वेळा चाली बदलणारी लावणी.

७. **प्रतिकात्मक लावणी** :- स्त्री-पुरूषांच्या भावना प्रतीकातून माडणारी लावणी.

Scanned with CamScanner

# नाचू किती

लघबग लघबग बिगी बिगी नाचत आली
थुई थुई नाचत आली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
ठेच लागली जाता जाता जाडवी कचकली
बाई माझी जाडवी कचकली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
बाजार पेठ कोल्हापूरची काय म्हणू हिला
नखरेल नार हि सोळा जातीची दिसली खरीतला
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
हे ज्वाणीच चाललय गुराळ चाललय गुराळ ग्वाड ग्वाड लय
बारा गावाचा जमलय दलाल ग्वाड ग्वाड लय
अहो काहिल भरली उखळी फुटली लयजण हरखली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
ठेच लागली जाता जाता जाडवी कचकली
बाई माझी जाडवी कचकली
या सुटल्या गाडया कश्या हो ग्वाड ग्वाड लय
कुणी डागल्या हो तोफा जश्या हो ग्वाड ग्वाड लय
गाडीचा अडडा सुंगधी कट्टा दुनिया हपापली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
नाचू किती लाजू किती कंबर लचकली
ठेच लागली जाता जाता जाडवी कचकली
बाई माझी जाडवी कचकली

Scanned with CamScanner

# पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

लाज धरा पावण जरा जणांची मनाची जणांची मनाची

पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

पोलाज जरा हिची कदर करा हिच काळीज समजून घ्या हो

पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

डावा मिटुनी खुणवू नका हो फिदी फिदी हसूनी हिणवू नका वो

आठवण जपली आठवण जपली मी तरुणपणाची

पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

अंगावर घेतला अंकुराचा साज अंगावर घेतलब अंकुराचा साज

सुखासंग दुखाच वेचल मी ओझ सुखासंग दुखाच वेचल मी ओझ

उरामध्ये हि निशाणी हि सख्या सजणांची उरामध्ये हि निशाणी हि सख्या सजणांची

पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

ध्यान जरा धरा हिच काळीज समजूण घ्या

हरपल भान हो वेडीपेशी झाली हरपल भान हो वेडीपेशी झाली

नाचून नाचून मी घामामध्ये न्याहाले

माती झाली बाई रुपाची गुणांची माती झाली बाई रुपाची गुणांची

पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

लाज धरा पावण जरा जणांची मनाची जणांची मनाची

पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची

Scanned with CamScanner

# रेशमाच्या रेघांनी

रेशमाच्या रेघांनी लाल काळया धाग्यांनी

रेशमाच्या रेघांनी लाल काळया धाग्यांनी

कर्नाटकी किशिटा मी का

ढीला हात नका लावू माझया साडीला हात नका लावू माझया साडीला हात नका लावू माझया साडीला

नवी कोरी लाख मोलाची भरली मी नक्षी फुल वेलांची वेलांची

नवी कोरी लाख मोलाची भरली मी नक्षी फुल वेलांची वेलांची

घुविअला रहो मोर रहो मोर जोडीला

हात नका लावू माझया साडीला हात नका लावू माझया साडीला

जात होते वाटेने मी बाई मी तोरयात तोरयात

अवचित आला माझया होरयात

तुम्ही माझया पदराचा शेव का वो ओढला

हात नका लावू माझया साडीला हात नका लावू माझया साडीला

भीड काही ठेवा आल्या देवाची मोरवंत राखा दहा डोळयांची

काय म्हणू तुमच्या या खोडीला

हात नका लावू माझया साडीला हात नका लावू माझया साडीला

रेशमाच्या रेघांनी लाल काळया धाग्यांनी

रेशमाच्या रेघांनी लाल काळया धाग्यांनीकर्नाटकी किशिटा मी काढीला हात नका लावू माझया साडीला हात नका लावू माझया साडीला

Scanned with CamScanner

# अप्सरा आली

कोमल काया किमोह माया पुनव चांदण न्याहाले सोन्यात सजले रुप्यात भिजले रत्न
प्रभा तनु ल्याले हि नटली तटली जशी उमटली चांदणी रंग महाली मी उमान
भिजली पाहून थिजली इंद्रसभा भोवताली

अप्सरा आली इंद्रपुरीतून खाली पसरली लाली रत्नप्रभा तणु ल्याली ती हसली गाली
चांदणी रंग महाली आप्सरा आली पुनव चांदण न्हाली

हो छबीदार सुरत देखणी जणु हिरकणी नार गुलजार

सांगते उमर कणछुकी गोकुळी मुखी सोसते भार शेलटी खुणावी कटी तशी हणुवटी
नयन तलवार

हिर ती मझ भरली दाजी ठिणगी श्रृंगाराची कस्तुरी दरवळली दाजी धूप हि वाराची

अप्सरा आली इंद्रपुरीतून खाली पसरली लाली रत्नप्रभा तणु ल्याली ती हसली गाली
चांदणी रंग महाली आप्सरा आली पुनव चांदण न्हाली

Scanned with CamScanner

# नृत्यांची बिझली कडाडली

तुफान सुटला वादळ वारा ढगांची लोभत झडली
नृत्यांची बिझली कडाडली नृत्यांची बिझली कडाडली
ईश्काची बिझली कडाडली ईश्काची बिझली कडाडली
ताला सुरांची झुंबड उठता ताला सुरांची झुंबड उठता
तालामधून ठिणग्या उमरदयांवानी अंगाला भिडली
नृत्यांची बिझली कडाडली नृत्यांची बिझली कडाडली
ईश्काची बिझली कडाडली ईश्काची बिझली कडाडली
धुंद नाचून मुखडा थोडा मी मदनाला घालीन खोडा
श्रृंगाराला डोळा घालता सुद बुद ती उडली
नृत्यांची बिझली कडाडली नृत्यांची बिझली कडाडली
ईश्काची बिझली कडाडली ईश्काची बिझली कडाडली
नजर बंदीच्या खेळासंग नजर बंदीच्या खेळासंग
असा बसतीन उडवीन रंग भल्या बुरयाची पर्वा नाही नशा मला चढली
नृत्यांची बिझली कडाडली नृत्यांची बिझली कडाडली
ईश्काची बिझली कडाडली ईश्काची बिझली कडाडली

Scanned with CamScanner

# चला जेजुरीला जाउ

लय दिसाची हौस राया चला आता पुरी करु

चला आता पुरी करु

चला जेजुरीला जाउ चला जेजुरीला जाउ

चला जेजुरीला जाउ चला जेजुरीला जाउ

एक आणा आबलक घोडा त्यांची रेशीम खाली सोडा

मागे बसा मी पुडयात बसते जगाला कौतुक दाउ

चला जेजुरीला जाउ चला जेजुरीला जाउ

चला जेजुरीला जाउ चला जेजुरीला जाउ

जेजुरीगडावर जाउ देव मल्हारीला पाहू देव मल्हारीला पाहू

आपण दोघ जोडीजोडीने बेल भंडारा वाहू

चला जेजुरीला जाउ चला जेजुरीला जाउ

चला जेजुरीला जाउ चला जेजुरीला जाउ

# देरे कान्हा चोळी अनूं लुगडी

अहो ऐका चतुरा अध्यात्माची काहाणी

कृष्ठांन फुलवल्या यमुनेवर गवळणी

पाहिल र ल ल ल ल ल ल

ऐन दुपारी गीळण नारी

आल्या युमुनेवरी

खुशाल सोडून दिल्या जळावर

Scanned with CamScanner

# समारोप

लावणीच प्रकार कोणताही असो लावण्याला तमाशात ही महत्वाची सामाजिक संस्था आहे बदलत्या कालाबरोबर तिच्या कालबाह्य बदल होत आहे. तसेच यात जागतिकीकरन, उदारीकरन मुकत आथिक धोरणाच्या जमान्यात ही संस्था कालबाह्य न होता आजही आपले अस्तित्व टिकवून आहे.

Scanned with CamScanner